*साहित्य आणि कला क्षेत्रातील गिरीश कर्नाड यांचे योगदान कायम स्मरणात राहील* *-सुधीर मुनगंटीवार*
==============================================

मुंबई दि 10: नाट्य, अभिनय, लेखन, चित्रपट आणि दिग्दर्शन या क्षेत्रात लीलया वावरणारे गिरीश कर्नाड आज आपल्यात नाहीत. सकस अभिनय आणि लेखनाने त्यांनी या सर्वच क्षेत्रावर एक प्रकारे गारुड घातलं होतं. आज हे हरहुन्नरी व्यक्तीमत्व काळाच्या पडदयाआड गेले आहे, साहित्य आणि कलेच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील अशा शब्दात अर्थ मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहे. साहित्य आणि कला क्षेत्रातील योगदानाबद्दल अनेक मोठ्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते. सामाजिक परिस्थितीवर परखड भाष्य करणारा कलाकार म्हणून त्यांचा वेगळा परिचय होता असे ही श्री मुनगंटीवार यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.